




# ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON 'THOUGHTS OF MAHATMA GANDHI : YESTERDAY, TODAY & TOMORROW'

**Organized by**

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

&


Department of History, Economics & Philosophy

## KARMAYOGI TULSHIRAM PAWAR MAHAVIDYALAYA, HADOLTI

Tq. Ahmedpur Dist. Latur (M.S.)

NAAC Accredited With 'B' Grade

**Saturday 28th October 2023**




Impact Factor - 7.9 (SRJIF)

## उदयगिरी बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका


ISSN - 2583-8423 (Online)
https://udayagiri.aaassher.org

A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History September - October - 2023 (ISSUE No - 04)

Chief Editor
**Dr. Anant N. Shinde**
Udayagiri Bahubhashik Itihas Sanshodhan Patrika

Executive Editor
**Dr. Deepak Bachewar**
Principal
Karmayogi Tulshiram Pawar Mahavidyalaya, Hadolti Tq. Ahmedpur Dist. Latur

Editors
**Dr. Ramesh Gangthade**
**Dr. Raosaheb Ingle**
**Dr. Suvarna Tenkale**



**Dr. UDHAV BHOSLE**
Ph.D. (IIT Bombay)
VICE-CHANCELLOR
डॉ. उद्धव भोसले
पीएच.डी. (आयआयटी बॉम्बे)
कुलगुरू

NAAC Re-accredited with B" Grade
नॅक पुनर्मूल्यांकन ब'' दर्जा

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,**
NANDED-431 606, Maharashtra
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड-४३१ ६०६, महाराष्ट्र

SRTMUN/VC_Message/2023-24/177 October 19, 2023

## VICE-CHANCELLOR'S MESSAGE

I am very happy to know that the Karmayogi Tulshiram Pawar Mahavidyalaya, Hadolti, Tq. Ahmedpur, Dist. Latur (MS) is organising a One Day Interdisciplinary National Conference on THOUGHTS OF MAHATMA GANDHI: YESTERDAY, TODAY AND TOMORROW on 28th October, 2023 in your esteemed college under the Department of History, Economics & Philosophy.

Mahatma Gandhi was a notable public figure. His role in social and political reform was instrumental. Every year on October 2nd, his birthday is commemorated globally as Gandhi Jayanti to respect his invaluable contributions towards India's freedom and teachings. As one of the most important political and social reformers of the 20th century, Gandhiji's ideas were multifaceted encompassing important spheres like self-reliance, swadeshi, upliftment of the downtrodden and empowerment through education.

The purpose of the seminar is to being together scholars, academicians from different parts of the state to exchange of knowledge and idea about the Thoughts of Mahatma Gandhi: Yesterday, Today and Tomorrow. I am sure that all related issues will be discussed in the seminar.

I wish the organizers a grand success of the national seminar. I also extend my best wishes to all participants and contributors of the seminar.

(Udhav Bhosle)
Vice-Chancellor

To
The Principal,
Karmayogi Tulshiram Pawar Mahavidyalaya,
Hadolti, Tq. Ahmedpur,
Dist. Latur (MS)

| | | |
|---|---|---|
| 16 | महात्मा गांधी व दांडी यात्रा<br>- प्रा. डॉ. सुरेश कातळे | 74 - 79 |
| 17 | महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना<br>- प्रा. डॉ. एकनाथ वैजनाथ भिंगोले | 80 - 84 |
| 18 | महात्मा गांधी आणि अहिंसा<br>- प्रा. डॉ. सूर्यकांत सावंत | 85 - 87 |
| 19 | महात्मा गांधीजींचे आर्थिक व सामाजिक विचार<br>- प्रा. डॉ. खोकले आर. के. | 88 - 94 |
| 20 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार<br>- प्रा. डॉ. गिरे संजय भाऊराव | 95 -100 |
| 21 | ग्रामीण विकासाच्या संदर्भात महात्मा गांधी यांचे विचार<br>- प्रा. डॉ. डी. पी. कांबळे | 101 - 104 |
| 22 | Thoughts of Mahatma Gandhi about Truth and Non Violence<br>- Dr. Rajkumar S. Kamble | 105 - 109 |
| 23 | महात्मा गांधीचे राजकीय विचार: एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>- प्रा. डॉ. सुखदेव पिराजी बलखंडे | 110 - 114 |
| 24 | महात्मा गांधीजींचे स्त्री सबलीकरणासंबंधीचे विचार<br>- फावडे पृथ्वी बालाजी | 115 - 117 |
| 25 | महात्मा गांधी और नई तालीम गांधीजी के बुनियादी शिक्षा की समीक्षा करते हुए पाठ्यचर्या निर्माण<br>- प्रा. डॉ. सीमा बर्गट | 118 - 123 |
| 26 | ग्रामविकास व महात्मा गांधी<br>- शरद रमेश सुरळकर | 124 - 130 |
| 27 | महात्मा गांधी की मानवतावादी विचारधारा<br>- प्रा. डॉ. गनी गफूर साहब शेख | 131 - 134 |
| 28 | महात्मा गांधी यांचे अहिंसा विषयक विचार<br>- प्रा. येगावकर मुकुंद व प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 135 - 139 |
| 29 | महात्मा गांधीजींचे औद्योगिकीकरण विषयक विचार : एक अभ्यास<br>- प्रा. डॉ. सूर्यवंशी भंडाजी रंगराव | 140 - 143 |
| 30 | गांधीजी का ग्रामीण विकास का दृष्टिकोण<br>- प्रा. डॉ. मौलाना महेताब सय्यद | 144 - 149 |
| 31 | भारत देशातील महान नेते महात्मा गांधी<br>- प्रा. डॉ. मधुकर विठोबा जाधव | 150 - 155 |

Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 115 – 117

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे स्त्री सबलीकरणासंबंधीचे विचार

फावडे पृथ्वी बालाजी

अर्थशास्त्र विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर ४१३५२१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: prathviphawade2@gmail.com

भारतीय इतिहासातील युगप्रवर्तक, सत्याग्रह दर्शनाचे प्रणेते, स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रगण्य सेनानी, विधायक दृष्टीचे समाज सुधारक आणि धर्म व निती यांच्या एक्यभवाचा पाठपुरवठा करणारे आधुनिक संत म्हणुन महात्मा गांधीजींची ओळख आहे. पाश्चिमात्य व भारतीय अशा दोन्ही संस्कृतीतील ग्राह्यांश आत्मसात करून त्यांनी स्वतःचे असे एक तत्त्वज्ञान बनविले. मानवतेची प्रतिष्ठा प्रतिष्ठान हा त्यांचा तत्त्वज्ञानाचा एक केंद्रबिंदू होता.

महिलांचे समाजातील स्थान व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी महात्मा गांधीजींचे मोलाचे योगदान होते. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये महिलांना अनेक बंधनामध्ये बंदिस्त केले होते. त्यांचे विश्व चार भिंतीच्या आत होते. महिलांना कुप्रथा मध्ये अडवून ठेवले होते. अशा परिस्थितीमध्ये महात्मा गांधीजींनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण विचार मांडले.

## उद्दिष्टे

प्रस्तुत महात्मा गांधीजींचे महिला विषयक विचार या संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१. महात्मा गांधीजींचे स्त्री विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधीजींचे महिला शिक्षण व स्वातंत्र्य विषयक विचारांचा अभ्यास करणे.

## महात्मा गांधीर्जीचे स्त्री विषयक विचार

समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना त्यांचे हक्क व स्वातंत्र्य नाकारले होते. बालविवाह,सतीप्रथा, जरठकुमारी विवाह, विधवा विवाह इत्यादी प्रथा परंपरांमध्ये स्त्रियांना आडवून ठेवले होते. या सगळयातून स्त्रियांना बाहेर काढून त्यांना त्यांचे

हक्क देण्याचे मत महात्मा गांधीजींचे होते. स्वराज्याच्या लढ्यात स्त्रियांनी सहभागी व्हावे असे मत महात्मा गांधीजींचे होते.

समाजामध्ये ज्या अनिष्ट प्रथा परंपरा आहेत यांचा अन्याय स्त्रियावर होतो अशा अनेक प्रथांना गांधीजींनी विरोध केला. गांधीजींच्या मते "बालविवाहातून विधवा झालेल्या स्त्रियांचा विवाह होणे गरजेचे आहे." बालविधवांना त्यांचे उरलेले आयुष्य वैद्यव्यात जगावे लागते. स्त्रियांचे दिन व केविलवाणी स्थिती संपुष्टात यावे यासाठी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. गांधीजी सांगतात "स्त्री अबला कशी मला कळत नाही स्त्री ही सहनशीलतेत ती बलवती आहे. मग स्त्री जात पुरुषापेक्षा अधिकच थोर ठरते. स्वतःला किंवा आपल्या जोडीदाराला जगात अधिक चांगल्या रीतीने जगता यावे अशी स्थिती निर्माण करण्याची ताकद तिच्यात आहे. त्यागाची आणि अहिंसेची मूर्ती म्हणून मी तिचे वर्णन करतो." स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे स्वातंत्र्य, हक्क, कर्तबदारी, उपजीविकेची संधी दिली पाहिजे. स्त्रियांनीही आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावे. चारख्यासारख्या लघु उद्योगाची त्यांनी उपलब्धता करून दिली.

गांधीजींनी स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांना सामावून घेऊन स्त्री सुधारण्याच्या क्षेत्रात कार्य केले. गांधीजींच्या स्त्री विचारातून स्त्रियांना त्यांच्या सामाजिक व राजकीय हक्काची जाणीव झाली होती. स्त्रियांमध्ये वैचारिक जागृती होऊन स्त्रिया राजकारणात व समाजकारणात सहभागी होऊ लागल्या. महात्मा गांधीजींनी ब्रिटिश विरोधी दिलेल्या लढ्यात महिलांचा लक्षणिय सहभाग होता. स्त्रियांना त्यांचे स्त्रीत्व सांभाळून पुरुषांच्या बरोबरीने कार्य करण्यासाठी गांधीजींचे विचार उपयुक्त पडले. 19व्या शतकामध्ये भारतात स्त्रियांचा राजकारणात सहभाग हा लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीत झाला पण स्त्रीला स्वतंत्र्यलढ्यात सामील करून घेण्याविषयी गांधीजींची भूमिका स्त्रीच्या जीवन समग्रतेच्या विचारपद्धतीशी तर्कसंगत अशी परिनती होती. ते असे प्रतिपादन करतात की," स्त्री पुरुष तत्त्वतः समान आहेत. स्त्रीला स्वतःचे व्यक्तिमत्व आहे. घराच्या चार भिंतीतून स्त्रिया बाहेर पडल्याशिवाय स्वातंत्र्य चळवळीला सामर्थ्य प्राप्त होणार नाही. स्वातंत्र्यलढ्यामध्ये संसारी स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग असलेले विषय हे स्वातंत्र्य आंदोलनाचे व विधायक कार्याचे विषय होते. उदा. जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, दारूबंदी इ.

गांधीजीच्या मते स्त्रियांनी स्वदेशीचा प्रचार करावा. गांधीजी सांगतात की," चरखा चालविणे व खादी वापरणे हे स्त्रियांनी आपले धार्मिक कर्तव्य म्हणजे पाहिजे. स्त्रीयांनी परदेशी कपडे, दागिने याचा त्याग करावा. महात्मा गांधीजींच्या राजकीय क्षितिजावरील उदयानंतर स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय सहभागाला वेगळे परिणाम प्राप्त झाले. एकीकडे अहिंसात्मक चळवळीमुळे स्वतंत्र आंदोलनात स्त्रियांचा सहभाग वाढला. तर दुसरीकडे सामाजिक व राजकीय आग्रह जागृतीमुळे स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. गांधीजींचे हुंड्याची चाल बंद व्हावी असे मत होते. हुंड्याबद्दल आग्रह धरणारा तरुण स्वतःच्या शिक्षणाला बट्टा लावतो. तो देशालाही कलंकित करून स्त्री जातीचा अपमानही करतो हुंडाच्या या अध:पतनकारी प्रथेविरुद्ध जोरदार लोकमत तयार करण्याची गरज आहे. आणि जे तरुण या पापमय पैशाचा स्वीकार करतील त्यांच्यावर समाजाने बहिष्कार टाकावा. मुलींच्या माता पित्यांनी इंग्रजी पदव्यांचा मोह सोडावा आणि आपल्या

मुलींना सन्मानाने वागवणाऱ्या जावयांच्या शोधात आवश्यक ते जातीय बंधने तोडण्याची तयारी ठेवावी. असे मत गांधीजींचे होते.

महात्मा गांधींनी महिलांमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन, शैक्षणिक प्रसाराचे महत्व, राष्ट्रीय भावना आणि विश्वास व नेतृत्व भावना जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. महिलाच जगाचा उद्धार करणारी महाशक्ती आहेत. महात्मा गांधीहे संपूर्ण जगाला अहिंसेचा संदर्भ देणारे महान विभूती आहेत. त्यांनी स्वातंत्र्याबरोबरच राजनैतिक, सामाजिक समस्याकडे लक्ष दिले. अस्पृश्यता ही मानवाला, देशाला आतून पोखरून खाणारा किडा मानला आणि ते निवारण्यासाठी प्रयत्न केले. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील भेदभावाची दरी कमी करण्यासाठी सत्य, अहिंसा, नैतिकतेला अधिक महत्त्व दिले. महिला सक्षमीकरणासंबंधी दृष्टिकोन स्त्री ही बुद्धी व योग्यतेमध्ये पुरुषापेक्षा कमी असते. असे गांधीजीचे मत नाही. ते म्हणतात अनादी काळापासून स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषाबरोबर आणि पुढे होती. महिला साक्षर झाल्या तर आपल्या अधिकाराप्रती जागृत होतील. विवाह जोडीदाराची निवड, हुंडा प्रथेला विरोध, बालविवाह, विधवा विवाहाचे समर्थन आणि मतदानाचा अधिकार याविषयी जागृत राहतील. असे मत गांधीजींचे होते.

**निष्कर्ष**

1. महात्मा गांधीजींच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनामुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली.
2. स्त्री शिक्षणामुळे त्यांच्या समाजातील दर्जाचे स्थान उंचविण्यास मदत झाली.

**संदर्भ सूची**


1. कुंभार नागोराव, (2012), 'महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान' - अरुणा प्रकाशन, लातूर
2. महात्मा गांधी, (2019) -'महात्मा गांधी विचार संग्रह' रिया पब्लिकेशन, कोल्हापूर
3. डॉ. भिसे आर. एम. - 'वर्तमान परिस्थितीत महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता', प्रशांत पब्लिकेशन
4. प्रा. श्रीराम जाधव, - 'गांधीजी आणि सामाजिक समता'
5. डॉ. पाटील डी.आर. -'महात्मा गांधी विचार व समकालीन समाज'

Advent Publishing
Publish your M.Phil. & Ph.D. Thesis
as
Books with Advent Publishing

IJHSSBMC
ISSN (online) : 2583-181X

उदयगिरी -
बहुभाषिक
इतिहास संशोधन
पत्रिका

ISSN (Online): 2583-8423

Advent Publishing
Online Book Store

Website : https://adventpublishing.in
Email : info@adventpublishing.in
Phone +91-9209280738
+91-9420288129
007, Aspen, Building No. 01
Mohan Highlands, Badlapur East
Mumbai - 421 503 (MH) INDIA

International Journal of Humanities, Social Science,
Business Management & Commerce
An International Peer Reviewed & Refereed
Scholarly Open Access Journal
(With SRJIF 8.1)
https://ijhsbc.iar-a.com/

A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed
Journal of History ISSN - 2583-8423 (Online)
(With SRJIF 7.9)
https://udayagiri.aaassher.org

Publish your books & Sell
on
Advent Publishing
Online Book Store